# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 192 / 2009 / 26 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect Shri Sachin Sharad Godase,
31, Siddharth Arcade, Railway Station, Aurangabad.
(Consumer No. 490011325251).

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Sachin Sharad Godase, 31, Siddharth Arcade, Railway Station,Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.

The hearing in this matter is kept on 24/03/2009 at 12=30 Hrs.

Encl: As above

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**

Shri Sachin Sharad Godase,
31, Siddharth Arcade,
Railway Station,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९२/२००९/२६**

**तक्रार दाखल दिनांक :- ०६/०३/२००९**
**निकाल दिनांक :- १५/०४/२००९**

**श्री सचिन शरद गोडसे,**
**३१,सिध्दार्थ आर्केड,स्टेशन रोड,**
**औरंगाबाद.**
**ग्राहक क्रमांक (४९००११३२५२५१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/०३/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/०३/२००९ रोजी ठेवण्यात आली.

अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचा सांराश खालील प्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना मागील सहा महीन्यापासुन मीटरवरील नोंदीप्रमाणे बिल न आकारता व प्रत्यक्षात रिडींग न घेता सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आले.या चुकीच्या व वाढीव बिलाबाबत त्यांनी महावितरण छावणी उपविभागाकडे केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली आहे.महावितरण वीज कंपनीस रिडींगप्रमाणे वीज बिल देण्याबाबत तसेच त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्यांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत अंतरिम आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक २४/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार सचिन गोडसे तसेच महावितरणतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराची मीटर बदलण्यात आल्यामुळे सरासरीवर आधारीत बिल आकारणी करण्यात आल्याचे पण त्यानंतर देण्यात आलेली वीज बिल हे योग्य असल्याचे आपल्या जवाबात म्हटले आहे.नोडल अधिकारी यांनी मीटर बदली अहवाल मंचात दाखल न केल्यामुळे मंचाने तो पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे तसेच अर्जदाराने दाखल केलेली तक्रार निकाली निघेपर्यंत अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येवु नये असा आदेश नोडल अधिकारी यांना दिला व याप्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०८/०४/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०८/०४/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे सी.पी.एल. व मीटर बदली अहवाल मंचात दाखल केला.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) अर्जदार व महावितरणतर्फे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावनीवरुन असे आढळुन येते की, अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याकडे बसण्यात आलेल्या मीटरचा क्रमांक ९००१२३१०३३ असा आहे.नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी.पी.एल.चे अवलोकन केल्यावर मार्च २००८ पर्यंत वीज बिलाबाबत अर्जदाराचा कोणताही वाद नव्हता दिनांक १७/०४/२००८ रोजी अर्जदाराचे जुने मीटर (क्रमांक ९००१२३१०३३) बदलण्यात आले.व त्याजागी नवीन मीटर क्रमांक ९०००८३८९१४ हे बसविण्यात आले.या नवीन मीटरवरील रिडींगची नियमीतपणे नोंद न घेण्यात आल्यामुळे एप्रिल २००८ पुढील काळात अर्जदारास अनेकवेळा सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आल्याचे दिसुन येते. दिनांक १७/०४/२००९ रोजी अर्जदाराचे मीटर बदलण्यात आल्यानंतर जुन्या मीटरवरील रिडींग ३०४३ अशी असल्याचे तसेच दिनांक १८/०३/२००९ रोजी कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्या स्थळपाहणी अहवाल मीटर क्रमांक ८३८९१४ यावरील रिडींग ०१४६२ अशी असल्याचे आढळुन येते. यावरुन दिनांक १७/०४/२००८ ते १८/०३/२००९ या (११ महीन्यात) काळात अर्जदाराकडे बसविण्यात आलेल्या नवीन मीटरने नोंदविलेला एकुण वीज वापर हा (०१४६२-००००१) १४६१ असा असल्याचे स्पष्ट होते.अर्जदाराने चुकीचा वीज बिलाबाबत केलेली तक्रार योग्य असुन मंच या प्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरणतर्फे अर्जदारास देण्यात आलेली एप्रिल २००८ पुढील सर्व वीज बिले रदद्र करण्यात येते आहे.

२) महावितरणतर्फे अर्जदारास १४६१ युनीट वीज वापराचे बिल हे अकरा महिन्याच्या कालावधीत विभागुन ३० दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे व या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

३) वरीलप्रमाणे सुधारीत बिल देतांना अर्जदाराने बिलापेटी भरलेल्या रकमेची वजावट करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९२/२००९/२६** **दिनांक :-**

**प्रति,**
**श्री सचिन शरद गोडसे,**
**३१,सिध्दार्थ आर्केड,स्टेशन रोड,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१९२/२००९/२६ )

आपण दिनांक ०६/०३/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**